# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ४८ // ऑनलाईन स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : ०९/०७/२०२१**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०९/०७/२०२१ शुक्रवार रोजी दुपारी ०४.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती पाटील राजेंद्र झिपरू यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या ऑनलाईन स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त. खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. पाटील राजेंद्र झिपरू सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| सोनवणे मुकुंदा भागवत | लढढा नितीन बालमुकुंद |
| बेंडाळे उज्वला मोहन | बरडे नितीन मनोहर |
| कोल्हे ललीत विजय | शेख सैईदा युसुफ |
| काळे अमित पांडुरंग | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिष कुलकर्णी, मा.अतिरिक्त आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, मुख्यलेखा परिक्षक, श्री.संतोष वाहुळे, नगरसचिव ,श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त, शाम गोसावी, उपायुक्त,प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी, श्री.कपिल पवार व सहा.आयुक्त. श्री.पवन पाटील उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेमध्ये सर्वांचे स्वागत आहे.

**मा.सभापती :-** नगरसचिव यांनी विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करावी.

**नगरसचिव :- विषय क्र. १:- दैनिक बाजार वसुली मक्त्याची देकार रक्कम सन २०२१-२०२२ करीता निश्चित करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.**

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदय, परंतु आज तारीख आहे दि.०९/०७/२०२१ आणि मक्तेदाराची मुदत संपत आहे उद्या, नविन मक्त्याची प्रक्रिया करणे संदर्भात एका दिवसात नविन निविदा करणेची प्रक्रिया करणेची सर्व तयारी प्रशासनाकडुन झालेली आहे का ? अनेक वेळेला प्रत्येक स्थायी समिती किंवा महासभेमध्ये या विषयांवर चर्चा होत असते. तब्बल २ वर्षापुर्वी झालेला मक्ता ज्याची मुदत संपायला २४ तास बाकी आहे. आणि २४ तासापुर्वी स्थायी समिती समोर डॉकेट येत की, मक्तेदाराला मुदतवाढ द्यावी किंवा नविन निविदा प्रक्रिया सुरु करावी. म्हणजे प्रशासन नेमकं करते काय ? का अस या विषयांना उशिर होत आहे.

**मा.उपायुक्त, श्री. प्रशांत पाटील :-** मा.सभापती महोदय, सदर मक्त्याची मुदत दि.१० ऐप्रिल २०२१ रोजी संपत आहे. या बाबतीत प्रस्ताव नगरसचिव कार्यालयाकडे दि.२९ जुन २०२१ रोजी सादर करण्यात आला होता.आमचा प्रयत्न असा होता की, मागच्या बैठकीच्या वेळेसच हा प्रस्ताव स्थायी समितीत यावा.मात्र त्यावेळेस मक्त्याची रक्कम कश्या पध्दतीने निश्चित करावी. याबाबत थोडया अडचणी होत्या. आपल्याला माहित आहे की, कोविडच्या प्रादुर्भावाने प्रत्यक्ष जी वसुली आहे हॉकर्सची त्याच्यात कमी झाल्यामुळे, प्रत्यक्ष वसुली कमी झाली आपली मागील वर्षाने. त्यामुळे या मागील वर्षामध्ये जी वसुली झाली आहे. तिचे आधार मानुन जर आपण मक्त्याची किंमत निश्चित केली. आणि भविष्यात कोविडचा प्रादुर्भाव कमी झाला किंवा कोविडचा प्रादुर्भाव झालाच नाही. परिस्थिती पुर्ववत झाली. त्यातुन मनपाचा आर्थिक नुकसान होण्याची शक्यता होती. या सर्व बाबींची चर्चा करण्यामध्ये मा.आयुक्त महोदय, मा.मुख्यलेखापरिक्षक यांच्याशी वेळोवेळी चर्चा करण्यात आली. आणि या सर्व चर्चा अंती असे निश्चित करण्यात आले की, मागील वर्षी जी आपण मक्त्याची किंमत ठरविलेली आहे. तिच्यातच १०% वाढ करण्यात यावी. आणि आपल्या अटीशर्तीमध्ये याचा समावेश करावा की, जर कोविडचा प्रादुर्भाव वाढला कोविडची ३ री लाट आली. आणि त्याच्यामुळे हॉकर्सची संख्या जर कमी झाली, तर त्या हॉकर्सच्या कमी उपस्थितीबाबत मक्तेदाराला आपण पाहणी करून सहुलत देण्याची अट त्याच्यामध्ये समाविष्ट करावी. असा निर्णय घेण्यात आला. आणि या प्रक्रियेमध्ये थोडासा कालावधी गेला. मात्र त्यातुन मनपाचा कुठलाही नुकसान होऊ नये. हाच त्याच्या मागचा हेतु होता की, थोडासा कालावधी झाला.

**श्री.नितीन लढढा :-** पाटील साहेब, आपण म्हणतात की, कोविडची परिस्थिती गेल्या दिड वर्षापासुन आहे. आणि गेल्या वर्षी सुध्दा आपण महसुली बघतांना वसुली मक्तेदाराचे म्हणणे आहे की, वसुली कमी झालेली

आहे. म्हणजे या संपुर्ण गोष्टी आपण गेल्या दीड वर्षापासुन ऑडीटला येत आहे. दि.२९ जुन २०२१ रोजी आपण डॉकेट पाठविल समजा दि.२९ जुन २०२१ ला ही आपण मान्य केल असत सभेमध्ये तरी सुध्दा प्रक्रिया पुर्ण होऊ शकली असती का? आणि हे आताच घडत आहे अश्यातला भाग नाही. याच विषयाच्या बाबतीत घडत आहे अश्यातला भाग नाही. अनेक विषयांच्या बाबतीत प्रत्येक वेळी हेच ओरडाओरडी असते सभागृहामध्ये, ज्या वेळेला आपल्याला माहिती आहे की, कुठलाही मक्ता आपण १ वर्षासाठी देतो आहे, सहा महिन्यासाठी देतो आहे की, २ वर्षासाठी देतो आहे. जेव्हा मक्ता संपण्याची तारीख आपल्याला निश्चितपणे माहित असते. जेव्हा आपण मक्ता देतो तेव्हाच मक्त्याची मुदत केव्हा संपेल हे नॉलेजला असत.आणि तरी सुध्दा वारंवार वारंवार या बाबींकडे दर्लक्ष होऊन आणि ऐन वेळेवरती प्रस्ताव सभेकडे येतो. ही बाब काही योग्य नाही. विहित मुदतीच्या आत ज्या वेळेला तुम्हाला माहित आहे. निविदा प्रक्रिया पुर्ण होण्यामध्ये साधारणता महिना दीड महिन्याचा कालावधी जात असतो. एखाद्या वेळेस प्रतिसाद नाही मिळाला तर फेर निविदा करावी लागते. हा सगळा कालावधी गृहीत धरुन साधारणता २ महिने पुर्वी प्रत्येक मक्त्याच्या बाबतीत निर्णय का घेतला जात नाही प्रशासनाकडुन.

**मा.सभापती :-** सन्मा.सदस्य आता हा जो मा.नितीन भाऊंनी विषय मांडला. असे विषय प्रत्येक सभेमध्ये आपले सन्मा.सदस्य मांडत असतात. आपल्या समोर जे प्रस्ताव येतात त्याची एकतर मुदत संपुन गेली असते किंवा मुदत संपण्यास दोन चार दिवस बाकी असतात. ८०% बरेच असे विषय आपल्याकडे येत असतात. आणि मला वाटते आपण अप्रत्यक्ष रित्या संबंधीत ठेकेदारांना मदत करण्याचा काम करतो. त्यांना एईन वेळेवर मुदतवाढ द्यावी लागते. असे वारंवार विषय होत असतात. या वेळेस झाल असे पुढच्या वेळेस होणार नाही. आयुक्त साहेबांनी आपल्याला बरेच वेळा सुचना केलेल्या आहे. पंरतु असे जर थांबतच नसेल तर मला वाटते आता आपल्याला कठोर निर्णय घेण्याची वेळे आलेली आहे. आणि जर हे थांबत नसेल तर कोणावर तरी ही जबाबदारी निश्चित करुन त्याच्यावर कार्यवाही केली गेली पाहिजे. आता वसुलीचा विषय आता हा आपण आज रोजी निश्चित झालेला नाही. आता हा ई-टेन्डर काढतो आहे आपण याला किती वेळ लागेल पाटील साहेब. १५ दिवसात प्रक्रिया पुर्ण होईल का ?

**मा.उपायुक्त, श्री. प्रशांत पाटील :-** १५ दिवस मुदत आहे त्याची.

**मा.सभापती :-** मला सांगा तुमच्याकडे डॉकेट येऊन सगळ करुन ई-टेन्डर किती दिवसात पब्लीश होऊ शकतो.

**मा.उपायुक्त, श्री. प्रशांत पाटील :-** पुढच्या आठवडयापर्यंत होऊ शकत.

**मा.सभापती :-** तुम्ही मला सांगा किती दिवस द्यायचे मंग आपण तेवढी मुदतवाढ देऊ शकतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, सभापती महोदय, समजा १५ दिवसाच्या आतमध्ये किंवा २० दिवसाच्या आत मध्ये निविदा प्रक्रिया ही पुर्ण झाली परंतु मागचा इतिहास पाहाता या डॉकेट वरुन साधारणता ३ ऱ्या रिकॉलला प्रतिसाद मिळालेला आहे. म्हणजे तिसऱ्यांदा निविदा प्रसिध्द झाली त्यावेळेला प्रतिसाद मिळालेला आहे.

**मा.सभापती :-** भाऊ आपल्याला प्रक्रिया तर राबावी लागणारच ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, प्रक्रिया सुरु होईल त्याबद्दल वाद नाही. माझ्या म्हणण्याचे तात्पर्य ऐवढच आहे. जर कधी अश्या पध्दतीने आपण आपल्या हातात ज्या वेळेला वेळ असतं. त्या वेळेचा योग्य उपयोग आपण करत नाही. मग आपण अश्या पध्दतीने मुदतवाढ देण्याच्या संदर्भात आज समजा मक्तेदार, मा.सभापती महोदय, या पध्दतीने आपण मक्तेदाराला मुदतवाढ देण्याच्या संदर्भात या डॉकेटमध्ये नमुद केलेले आहे. उद्या समजा मक्तेदाराने मुदतवाढ घेण्यास नकार दिला, नकार दिल्यानंतर महानगरपालिकेकडे आपली पर्यायी व्यवस्था आहे का ? संपुर्ण शहरातुन या हॉकर्सकडुन मक्त्याची रक्कम जमा करण्याचे दृष्टीकोणातुन काही तशी पर्यायी व्यवस्था करुन ठेवलेली आहे का ?

**मा.सभापती :-** यासोबतच दुसरा उपप्रश्न आहे, मुदतवाढ देतांना त्यांनी मागे जी वसुली दिलेली आहे. त्यात आता तुम्ही कसे ठरविणार ते की, आपण त्यांच्याकडुन कश्या पध्दतीने वसुली करणार.आपण चुकीचा तक्ता केलेला आहे. तो तक्ता मान्य आहे का ? ठेकेदाराला वसुलीचा, हे तुम्ही ४ महिन्याच ६ महिन्याच दिले होते डॉकेटमध्ये मागच्या मिटींगला स्थायीत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.सभापती महोदय,

**मा.सभापती :-** मग तो त्याला मंजुर आहे का ? मुदतवाढ द्यायची तर कोणत्या येच्याने द्यायची मुदतवाढ

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** आपण त्या वेळेला सर्व्हेक्षण केल होत आणि त्या सर्व्हेक्षणाच्या आधारावर ही संख्या निश्चित करण्यात आली. त्या सर्व्हेक्षणाच्या आधारे तो प्रस्ताव स्थायी समिती पुढे सादर करेल.

**मा.सभापती :-** आपण आता मुदतवाढीचा विचार करतो आहे. मुदतवाढ देतांना संबंधीत ठेकेदार त्या वसुलीप्रमाणे रक्कम जमा करायला तयार आहे का ? त्यांच्यावर काही तरी आपले त्यांच्यावर किती बाकी आहे, २१, ७३,०००/- त्याच्यावर त्याचे ॲब्जेक्शन आहे. आता पुढच्या महिन्याची मुदतवाढ देतांना तुम्ही कश्या पध्दतीने ठरवुन देणार.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** सद्याची जी आकारणीची पध्दत आहे त्याच आधारावर,

**मा.सभापती :-** ती आकारणी त्यांना मान्य आहे का ?

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** मक्तेदाराची जर तयारी नसेल.

**मा.सभापती :-** मक्तेदाराला जर ती मान्य नसेल. तर मुदतवाढ द्यायची कशी.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** मक्तेदाराची जर तयारी नसेल तर आपण आपल्या मनपाचे कर्मचाऱ्यांमार्फत वसुली करण्याची तयारी करुन ठेवलेली आहे. मग आता आपल्याला निर्णय घ्यावा लागेल नेमके काय करायचे ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु पाटील साहेब, आपण तयारी जरी करुन ठेवलेली असली ना तर यापुर्वीचा आपण जुना इतिहास बघाल महानगरपालिकेच्या वसुलीचा कर्मचाऱ्यांच्या वसुली करण्यामध्ये मोठया प्रमाणावर महानगरपालिकेला तुट आलेली आहे. मग अश्या तुटीची जबाबदारी केणावर टाकाल. कर्मचाऱ्यांना दिलेले उद्दिष्ट पुर्ण होऊ शकेल का ?

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** त्याचे नियोजन करावे लागेल आणि त्यांच्याकडुन योग्य पध्दतीने वसुली होईल याची दक्षता घ्यावी लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** न झाल्यास काय ? कारण मी म्हणतो आहे ना तुम्ही मागचा इतिहास बघा. ज्या ज्या वेळेला मनपाने स्वत : म्हणजे मी याच्याच बाबतीत म्हणत नाही मी जाहिरात कराच्या बाबतीत ही उदहारण तुम्हाला देतो. जाहिरात कराचा मक्ता काढलेला होता मागे ३ वर्षासाठी, त्याचा उत्पन्न ते उत्पन्न आज गेल्या सात आठ वर्षानंतर महानगरपालिका त्या उत्पन्नाचा टप्पा गाठु शकत नाही. म्हणजे जेथे जेथे कर्मचाऱ्यांचा संबंध येतो वसुलीच्या बाबतीतला तेथे तेथे महानगरपालिकेला सातत्याने तुटच आलेली आहे.मग अश्या परिस्थितीत काय करणार.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** मक्तेदाराची जर तयारी नसेल, तर आपल्याला आपल्या कर्मचाऱ्याकडुन प्रभावीपणे वसुली करुन घेण्याची आपल्याला कार्यवाही करावी लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ती तर पर्यायी करावीच लागेल.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** हो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्या बद्दल वादच नाही. परंतु उत्पन्नामध्ये जर कधी तुट आली, तर त्या तुटीची जबाबदारी कश्या पध्दतीने आपण भरपाई कराल.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** बाला ताई,

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय, म्हणजे प्रशासन अजुन ही जर तरचीच उत्तरे देत आहे. त्यांचे अजुनही काही ठरलेले नाही. जर मक्तेदाराने नाही म्हटले तर ते म्हणत आहे की, आपण महापालिकेचे कर्मचाऱ्यांकडुन काम करु पण त्यांची ती पण यंत्रणा आहे की नाही हे पण त्यांना माहित नाही. मग असा विषय आला कशाला, घेता कशाला हे कशाला वेळ वाया घालवता सदस्यांचा, साहेब काय म्हणत आहे की, २९ तारखेला जर हा विषय आलेला आहे, मागच्या सभेला जर हा विषय माहिती होता मुदत संपलेली आहे, प्रत्येक वेळेला वारंवार हाच विषय होतो, मुदत संपलेली असते आणि मग विषय येतात. आता एक दिवस अगोदर येथे विषय येत आहे. म्हणजे चालले काय आहे, प्रशासन करते काय आहे. कुठल्या पध्दतीचा काम करत आहे. जर तुमच्याकडे यंत्रणाच नाही तर एकाकडे काय म्हणत आहे ते की, मक्तेदाराने जर तयारी नाही दाखविली तर काम आमचे कर्मचारी करतील. परत दुसरीकडे म्हणत आहे की, कर्मचाऱ्यांकडुन बघावा लागेल, म्हणजे समजायचे काय आम्ही सदस्यांनी की काम कसे करणार आहे.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** ताई याच्यात दोन बाबी आहे. एकतर मक्तेदाराला मुदतवाढ देण्यासाठी, स्थायी समितीची मान्यता आवश्यक राहील. जर स्थायीने मान्यता दिली तर मक्तेदाराची तयारी आहे का ? ते

पाहावे लागेल. जर मक्तेदाराने तयारी दर्शविली नाही तर आपल्या कर्मचाऱ्यांकडुन ११ तारखेपासुन वसुली सुरु करता येईल आपल्याला, करण्याची तयारी आहे प्रशासनाची,

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** मुदतवाढ देतांना आपण त्यांच्याशी चर्चा केली का ? इतके इतके तुम्हाला महिन्या काठी भरावे लागतील. काही झाली आहे चर्चा.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** सर्व्हेक्षणानुसार,

**मा.सभापती :-** सर्व्हेक्षणानुसार त्यांच्याशी चर्चा झाली का ?

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** सर्व्हेक्षणानुसार पैसे भरायला सांगितले आहे,

**मा.सभापती :-** प्रशासनाने जो सर्व्हेक्षण केलेला आहे, त्यानुसार संबंधीत ठेकेदार जर रक्कम जमा करायला तयार असेल. तर त्यांना वसुलीचा अधिकार दिला जाईल. नाही तर ११ तारखेपासुन आपले कर्मचारी वसुली करतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही म्हणजे सर्व्हेक्षणानुसार आज काय परिस्थिती आहे. आता तर कोविडचे निर्बंध दुर केले गेले आहे. आज कोविडचे निर्बंध पुर्वी सारखे नाही. तर नेमके आजच्या वसुलीची परिस्थिती काय ? म्हणेज मक्तेदाराला समजा इनकेस तुम्हाला मुदतवाढ देण्याची आवश्यकता वाटली तर नेमके मक्तेदाराकडुन दैनंदिन वसुली किती केली जाईल. म्हणजे त्या विषयाची थोडी स्पष्टता मला प्रशासनाकडुन अपेक्षित आहे.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** एक हजारच्या जवळपास हॉकर्सची उपस्थिती आहे आणि ती बदलत असते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जसे साधारणता आपण पुर्वीच्या याच्यानुसार दरदिवशी उत्पन्न किती येत होते आपल्याला पुर्वी दिलेल्या रकमेचा जो मक्ता आहे, तर त्या अनुषंगाने दैनिक उत्पन्न किती गृहीत धरतो आपण, मुळ मक्ता जो दिलेला होता.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** मुळ मक्त्यात आठवडयाला रु.३ लाख वसुली आपल्याला त्याच्याकडुन अपेक्षित आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** हो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता समजा पुढील निविदा प्रक्रिया होई पावेतो, आपण मक्तेदाराला समजा मुदतवाढ दिली. तर साधारणता किती उत्पन्न महानगरपालिकेकडे येऊ शकेल.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** जर हजार आपण धरले सरासरी तर आठवडयाचे १ लाख ४० हजार होतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** १,४९,०००/- परंतु आता कोरोनाचे निर्बंध तर हे पुर्ण पणे उठविण्यात आलेले आहे. ४ वाजेपर्यंत हॉकर्स जे आहे ते प्रत्येक रस्त्यावर असतात.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** नाही, अजुन ही काही निर्बंध लागु आहे. आठवडे बाजार अजुनही भरत नाही. त्याच प्रमाणे अतिक्रमणची कार्यवाही प्रभावीपणे सुरु आहे. आता आपला फुले मार्केट आणि आजुबाजुचा जो परिसर आहे. त्याच्यासाठी आपला धोरण असा आहे की, त्या साईडला कोविडच्या काळामध्ये बसायला नकोच. याबाबतीत आपले आयुक्त, उपायुक्त यांनी या ठिकाणी पाहणी केली होती. आणि कोविडच्या काळात हॉकर्स त्या ठिकाणी बसायला नकोच असा आपला सद्या धोरण आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्याच धरतीवर जर कधी आपण हा मक्ता काढला की, मागील म्हणजे याच्यामध्ये कुठल्याही पध्दतीची १०% दरवाढ न करता, मग त्याला प्रतिसाद कसा मिळेल.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** त्याच्यामध्ये आपण आता एक क्लॉज समाविष्ट करत आहोत की, जर काविडचे निर्बंध असेल आणि हॉकर्सची संख्या कमी झाली तर आपण सर्व्हेक्षण करुन त्याची संख्या निश्चित करावी हॉकर्सची.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो पण आता सर्व्हेक्षण मला सांगा आपण किती दिवस करणार. आठवडयातुन २ दिवस करणार की, चार दिवस करणार की रोज करणार.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** त्यात अडचण अशी आहे की, जर हॉकर्सची उपस्थिती कमी आहे, असे समजुन मक्त्याची रक्कम जर कमी केली आणि यदा कदाचित भविष्यात कोविडचा प्रादुर्भाव संपला, ते निर्बंध नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला सांगा पाटील साहेब, आपला मुद्दा योग्य आहे त्याबद्दल वाद नाही. परंतु आज आपण म्हणतात की, हजारच्या जवळपासची संख्या आहे. याचा सर्व्हेक्षण आपण किती दिवसात करतो. ज्या दिवशी

आपले कर्मचारी सर्व्हेक्षण करायला गेले असतील, त्या दिवशी १००० ची संख्या असेल, दुसऱ्यादिवशी १५०० ची असेल, तिसऱ्या दिवशी २००० ची असेल, या सर्व्हेक्षणाचा आधार काय नेमके ?

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** नाही, याच्यासाठी आपण एक कर्मचारी नेमला आहे. तो त्याचे दैनिक सर्व्हेक्षणाचे अहवाल लिहुन आणतो, आणि आवश्यकता पडली तर कार्यकारी अधिक्षक आठवडयातुन दोन तिनदा स्वत: पाहणी करतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** साहेब मला सांगा, आपली यंत्रणा किती तत्पर आहे आणि किती योग्य पध्दतीने सर्व्हेक्षण होत असेल. आणि त्याच्या सर्व्हेक्षणावर विसंबुन राहुन आपण आपल्या मक्त्याचे रकमा ज्या आहे आपण कमी किंवा जास्त करत असतो. कुठेतरी ह्या सिस्टीम्स आहे ना निकामी झालेल्या सिस्टीम्स आहे सगळया.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** अडचण तीच आहे की, जर आपण मक्त्याची रक्कम, आपल्याला हे मान्य करावे लागेल की, हॉकर्सची उपस्थिती सद्या कमी आहे. कोविडच्या प्रादुर्भावामुळे आणि निर्बंधांमुळे ती जर कमी गृहीत धरुन मक्त्याची रक्कम निश्चित केली आणि पुढे जर ते प्रादुर्भाव नाही राहिला तर आपले नुकसान होण्याची शक्यता आहे त्यात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही, बघा मागच्या स्थायी समितीसमोर पाठविलेल्या डॉकेट मध्ये कर्मचाऱ्यांनी केलेल्या सर्व्हेक्षणाचा अंदाज आणि त्यावेळेचे उपायुक्त होते मुठे साहेब आणि त्यांनी घेतलेला निर्णय याच्या मध्ये सुध्दा विसंगती आहे. म्हणजे शेवटी बघा काम कुठेही द्यायला एक तत्थ्य आणि आधार असायला हवा की, या आधाराच्या अनुषंगाने आम्ही या निष्कश पर्यंत पोहचुन ही रक्कम निर्धारीत केलेली आहे. परंतु तसा होतांना दिसुन येत नाही. कर्मचारीने समजा तो सर्व्हेक्षण किती प्रामाणिकपणे केलेला आहे. त्याची ऑथेंटीसीटी काय ?

**मा.सभापती :-** भाऊ, आधी आपण हे पुर्ण विषय करुन घेऊ. आता हा जो विषय आहे याच्यासाठी आपल्याकडे दोनच पर्याय आहे. एकतर ठेकेदाराकडुन वसुली करणे. किंवा कर्मचाऱ्यांकडुन आता आपण ठरल्याप्रमाणे जसे सांगितले की, जो सर्व्हेक्षण केलेले आहे कर्मचाऱ्यांनी त्याप्रमाणे संबंधीत ठेकेदार जर रक्कम भरण्यास तयार असेल तर त्यांच्याकडुन वसुली करायची अन्यथा आपले कर्मचारी वसुली करतील. राहिला टेन्डरींगचा विषय त्याच्या आधी आपले जे, तुम्हाला आवाज येत आहे भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो येत आहे.

**मा.सभापती :-** आपण सर्व प्रमुख पदाधिकारी बसुन प्रशासनासोबत चर्चा करुन किती वाढ करायची किती कमी करायचे आपण सर्व मिळुन निर्णय घेऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता ही मुदतवाढ देतांना तुमची नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होई पावेतो ही मुदतवाढ द्यावी लागेल.

**मा.सभापती :-** तेवढीच तेवढीच द्यायची, निविदा प्रक्रिया होई पर्यंत बस, त्याच्यावर नाही द्यायची. आणि त्यांच्याकडुन आपण टाईम लिमिट घेऊन टाकु की, ऐवढया दिवसांमध्ये निविदा प्रक्रिया पुर्ण झाली पाहिजे. प्रशासनाकडुन टाईम लिमिट घेऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा सभापती महोदय, आणि याच पध्दतीने मी म्हणतो, जाहिरातीचा मक्ता जो आहे. तो अनेक वर्षाने मनपाने काढलेला नाही. त्याचेही उत्पन्नामध्ये मोठी घट येत आहे. पाटील साहेब या संदर्भातही थोडा अभ्यास करावा की, जाहिरातीचा मक्ता जो आहे गेल्या ७-८ वर्षापुर्वी तिन वर्षाचा मक्ता काढण्यात आलेला होता. त्या वेळेचे उत्पन्न आणि आताचे उत्पन्न याचा तुलनात्मक आपण अभ्यास केले तर आपल्या लक्षात येईल. याच्यामध्ये ही मनपाचा किती मोठा आर्थिक नुकसान होत आहे. तर या सगळया गोष्टींचा अभ्यास करुन जेणेकरुन त्याच्यातुन सुध्दा मनपाची मॅनपावर थोडी कमी लागेल. आता जो उत्पन्न मिळतो त्याच्यापेक्षा जास्त उत्पन्न मिळेल. त्या बाबतीत ही योग्य निर्णय घेण्यासंदर्भात सुचना द्यावयात.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** ती कार्यवाही करतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे.

**मा.सभापती :-** ताई, उज्वलाताई. सुचक अनुमोदन.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सांगितले ना नितीन भाऊंनी, प्रस्ताव मान्य आहे.

**मा.सभापती :-** नितिन भाऊंचा अनुमोदन आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** फक्त टेन्डर प्रोसेस लवकरात लवकर करण्यात यावी.

**नगरसचिव :-** विषय क्र.१ सर्वानुमते मंजुर, भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर, मंजुर

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३४६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर व लागू असलेल्या निर्बंधाच्या अनुषंगाने सुभाष चौक, बळीराम पेठ, शिवाजी रोड, फुले मार्केटमधील व परिसर आयुक्त, पोलिस अधिक्षक, उपायुक्त(अतिक्रमण) यांचेकडून त्या परिसरात हॉकर्सला ६ महिन्याकरीता व्यवसाय करण्यास बंदी करणेबाबत आदेशित करण्यात आलेले असून त्याची अंमलबजावणी सुरु आहे. त्यामुळे सध्या इतर भागात अंदाजीत ८०० ते ९०० हॉकर्स आहेत. कोरोना-१९ चा भविष्यात प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता विचारात घेऊन एकुण अंदाजीत हॉकर्स व कोविड-१९ चे निर्बंधानुसार सध्याचे हॉकर्स यांचे अवलोकन करुन जर देकार रक्कम निश्चित केली व भविष्यात कोविड-१९ चा प्रादुर्भाव कमी झाल्यास मनपाचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या करीता जर कोरोना-१९ चा प्रादुर्भाव वाढल्यास व हॉकर्सच्या उपस्थितीवर निर्बंध आल्यास स्थायी समितीच्या मान्यतेने भरणा रक्कमेत सुट देणेचे आयुक्त यांना अधिकार राहतील मात्र नियमित अतिक्रमण कार्यवाहीमुळे मक्तेदारास कोणतीही सुट देता येणार नाही. याप्रकारची अट निविदेत / करारनाम्यात समाविष्ठ करणेत यावी तसेच नोंदणीकृत व अनोंदणीकृत फेरीवाल्यांची संख्या पाहता (सुमारे ३०००) गतवर्षीच्या निश्चित रक्कमेत (१.६९ कोटी) १० टक्के वाढ करुन एकूण रक्कम रु.१,८६,३४,०००/- मात्र निश्चित करण्यात यावी. वर नमूद देकार रक्कम निश्चित करणेस, तसेच वरील अटी निविदेत समाविष्ट करणेस, त्यानूसार ई-निविदा प्रसिध्द करण्यात यावी तसेच ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपावेतो विदयमान मक्तेदारास वर नमूद अटीसह तसेच प्रशासनाने केलेल्या सर्वेक्षणानूसार मक्तेदार रक्कम भरणा करण्यास तयार असल्यास मुदतवाढ देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मक्तेदाराने सर्वेक्षणानूसारची रक्कम भरणेस नकार दिल्यास मुदतवाढ तात्काळ रद्द करुन मनपा कर्मचाऱ्यांमार्फत वसूलीची कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ०८ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव :- विषय क्र. २:-** जळगांव शहरातील भटकी व मोकाट कुत्री पकडुन (प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६०, महाराष्ट्र संरक्षण प्राणी कायदा १९७६ आणि प्राणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१ नुसार) नसबंदी शस्त्रक्रीया करणे तदनंतर ॲन्टी रेबीज लसीकरण करून बेल्ट / कॉलर चिप व कानावर V नॉच करून पकडलेल्या पुर्ववत ठिकाणी कुत्रे सोडणेकामी AWBI मान्यता प्राप्त निविदाधारक मे.नवसमाज निर्माण बहुउद्देशिय संस्था, नंदुरबार यांचे प्रति श्वान करीता रक्कम रू. ९३८/- याप्रमाणे आलेल्या दरास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**मा.सभापती :-** ताई, उज्वला ताई.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.सभापती महोदय,

**मा.सभापती :-** हा, बोला भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी म्हटल, या कुत्र्यांचे निर्बीजीकरण ज्या ठिकाणी करण्यात येईल ना. त्या ठिकाणी सी.सी. टी.व्ही. कॅमेरेच्या संदर्भातली व्यवस्था करायला पाहिजे. प्रत्येक झालेल्या कुत्र्याच्या निर्बीजीकरणा संदर्भातला डाटा डेली महानगरपालिकेला सबमीट केला गेला पाहिजे. V नॉच लावतील जी.पी.एस.सिस्टीमने हे त्याला ट्रॅक करतील. परंतु एकच कुत्र्याचा वारंवार V नॉचींग केल गेल तर त्याचा पुरावा काय राहील. म्हणुन रोजच्या रोज जर १०० कुत्र्यांचा हे झालेले असेल. त्याठिकाणी सी.सी.टी.व्ही चे फुटेज. त्याच्यावरुन त्या कुत्र्यांची मोजणी होणे अपेक्षित आहे. अन्यथा याची पडताळणी करणे खुप कठीण आहे. कारण यापुर्वी ही बरेच मक्ते झालेले आहे. त्याच्या मधील अनुभव असेच येतात आपल्याला की, या संपुर्ण व्यवस्थेला तपासणे

कामी अशी कोणतीच व्यवस्था नाही की, समजा आज नवीपेठ भागातुन ५० कुत्रे नेले. पुन्हा तेथे सोडुन दिले. त्या ५० कुत्र्याची वेरिफीकेशन कोण करणार की, यांची नसबंदी झालेली आहे किंवा नाही. किंवा सर्जरी न करता नॉच लावुन दिला आणि बिल रिकॉर्ड केले गेले. या संदर्भात या सर्व गोष्टी कुठेतरी क्रॉसव्हेरीफीकेशन होणे गरजेचे आहे. कारण प्रत्येक कुत्र्यामागे रु.९३८/- खर्च करायचे आहे.

**मा.सभापती :-** भाऊ, ज्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण केले जाईल. त्यांचे फोटो काढले जाणार आहे. पाटील साहेब डिटेल माहिती देतील आपल्याला.

**श्री.नितीन लढढा :-** राजु भाऊ कुत्र्यांचे फोटो काढले ना. बऱ्याच कुत्र्यांच्या रंग संगती मिळत्या जुळत्या असतात. एका कुत्र्याचा फोटो आज लावला आणि त्याच कुत्र्याचा फोटा सहा महिन्यानंतर लावला तर आपल्या लक्षात सुध्दा येणार नाही की, हा तोच कुत्रा होता की वेगळा कुत्रा होता.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** सन्मा.सभागृह, ज्या भागातील कुत्रे उचलले जाणार आहे त्यांची संख्या आपण डेली बेसीसवर हे करणार आहे आणि या कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी आपण आता AWBI रूलप्रमाणे एक समिती आपण नेमणार आहोत. त्याच्यात ७ ते ८ सदस्यांचा समावेश असणार आहे. पुर्वी ज्या चुका झालेल्या आहे त्या टाळण्याचा प्रयत्न आपण करणार आहे. त्यामुळे हे काम प्रभावीपणे करणेचा निश्चित प्रयत्न केले जातील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पाटील साहेब, काम प्रभावीपणे होणे संदर्भात काही अडचण नाही. फक्त याच्या संदर्भात मी हेच म्हटल की, या संपुर्ण पध्दतीवर नियंत्रण असणे अपेक्षित आहे. कारण प्रत्येक कुत्र्या मागे रु.९३८/- खर्च होणार आहे.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** हो हो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जर कधी रोज ५-१० कुत्र्यांची हेराफेरी झाली तर ३ ते ४ हजार रुपये रोजचा फटका बसेल महानगरपालिकेला.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** नाही भाऊ, तसे काय होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे याचे खुप काटेकोरपणे आपल्याला नियोजन करावे लागेल.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** नक्की.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कारण कोणी जाऊन त्या कुत्र्यांना चेक करणार नाही. कोणी त्या निर्बीजीकरण गृहात जाऊन माहिती घेणार नाही सामान्य माणुस, एखादा विषय असतो की, जेथे सर्व सामान्य माणुस जाऊन माहिती घऊ शकतो. परंतु हा असा विषय आहे की, तेथे जाऊन याचा रेकॉर्ड तपासणे किंवा त्याचे वेरीफिकेशन करणे, क्रॉस वेरिफाय करणे इतके सोपे काम नाही.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** याचा डेली बेसीसवर रेकॉर्ड पुर्ण मेनटेन केला जाईल. एका दिवसात किती कुत्रे एका ठिकाणाहुन पकडले, नंतर किती कुत्र्यांची शस्त्रक्रिया केली गेली. आणि ५ दिवसानंतर किती सोडले गेले याबाबतचा डेली रिपोर्ट आम्ही मेनटेन करु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि तेथे

**मा.सभापती :-** भाऊ, भाऊ,

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा राजु भाऊ.

**मा.सभापती :-** दिलेल्या माहितीनुसार डिजीटल कॅमेरे जे आहे, त्याच्यावर तारीख वेळ सगळ येत. ते मला वाटत रेकॉर्ड राहील ते फोटोवर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो, आणि तेथे सी.सी.टी. कॅमेऱ्यांची व्यवस्था करायला हवी.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** कुठे करणार ही व्यवस्था

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** टी.बी.एस. हॉस्पीटलच्या पार्कींग मागे ज्या बिल्डींग्स आहेत ना. तेथे आपण ॲपरेशन थेटर्स आणि काही बिल्डींग तयार करतो आहे आता, त्या ठिकाणी ऑपरेशन वगैरे केले जाणार आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आणि किती जणांची टिम असणार आहे.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** त्यासाठी मक्तेदाराने ३ डॉक्टर्सची व्यवस्था केलेली आहे. काही बॅचेस त्यांनी नेमलेले आहे. त्याचा पुर्ण प्लॅनींग तो ज्या वेळेस आपण वर्कऑर्डर देऊ त्या वेळेस सबमीट करणार आहे .

**मा.सभापती :-** ताई, व्हिडीओ ऑन करा तुमचा

**सौ.उज्वला बेंडाळे :-** कश्या प्रकारे करणार आहे म्हणजे रुम वेगवेगळया असणार की, कश्या पध्दतीने ठेवणार आहे त्यांना.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** तेथे जे ७ ते ८ बिल्डींग आहे तेथे आपण रुम तयार करुन घेतो आता आणि पिंजरे वगैरे तयार करुन घेणार आहे. त्याच्यामध्ये एक ॲपरेशन थेटर असणार आहे. एका भागाच्या बिल्डींग मध्ये आता जे कुत्रे नविन पकडुन आणले ते असणार आहेत आणि त्याच्या ऑपोजीट साईटला जे ॲपरेशन करुन झाले असे कुत्रे ५ दिवसासाठी पोस्ट ॲपरेटीव्ह केस म्हणुन ठेवले जाणार आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** किती दिवसासाठी.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** ऑपरेशन झाल्यानंतर साधारणता ५ दिवस.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** ऑपरेशन झाल्यानंतर ५ दिवस ठेवण्यात येतील. आणि ५ दिवसानंतर.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** पुर्वी जेथुन पकडले तेथे सोडण्यात येईल.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आणि काही ठिकाणी असे आहे जेथे रोगी कुत्रे आहे, त्यांचे काय करणार.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** त्यांची जी डॉक्टर्सची टिम आहे ना. ती उपचार करणार आहे त्याबद्दल

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नाही मग तुम्ही त्यांना पण पकडुन आणणार आहे का ?

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** हो त्यांना पकडुन ते त्यांची तपासणी करतील पहिले. त्यांचेवर वेगळे काही रोग असतील तर औषध उपचार करतील त्याच्यावर.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आपल्या या टेन्डर मध्ये आहे का ते पण.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** त्याचा ते ॲडीशनल करणार आहे. आपण त्यांना फक्त निर्बीजीकरणाचाच मक्तेदाराला खर्च देणार आहोत. त्यांच्या कामामध्ये हे सुध्दा इनक्ल्युड असणार आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हो ना, आता आपण जो खर्च अपेक्षित धरलेला आहे. त्याच खर्चामध्ये आपण ते पण इन्क्ल्युड केलेले आहे का ? ते मला विचारायचे आहे.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** हो. ABC रुल प्रमाणे त्या गाईडलाईन्स आहेत. त्याच्यामध्ये स्पष्ट निर्देश दिलेले आहे की, असे जे रोगी कुत्रे वगैरे असतील त्यांचा औषध उपचार आणि तो असा मक्तेदार वेगळे करणार आहे. मक्तेदाराला पेमेंट फक्त निर्बीजीकरणाचच मिळणार आहे.

**मा.सभापती :-** ताईंचे म्हणणे असे आहे की, ज्या कुत्र्यांना आपण ऑपरेट करणार आहे त्याची अमाऊंट ठरलेली आहे. पण त्यांच्यावर जे उपचार करु त्याची अमाऊंट वेगळी आहे का ?

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** नाही, त्याच्यातच इनक्ल्युड आहे. ABC रुलच्या गाईडलाईन्स मध्ये असे आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** साहेब, आता काही तरी रु.९३८/- रक्कम आपण निर्बीजीकरणासाठी ठरविलेली आहे. मग जी रोगी कुत्रे आहे. त्यांच्यावर किती खर्च होणार आहे. आपल्याला काय माहिती किती खर्च होणार आहे.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** तेच सांगतो मी, जे कुत्रे आपण पकडुन आणु त्यांना जर काही आजार असतील ना. तर त्याच्यावर औषध उपचार करण्याची जबाबदारी मक्तेदाराचीच आहे. परंतु निर्बीजीकरण करण्याचाच खर्च आपण त्याला देणार आहोत.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** तर जो पर्यंत ते आजारी आहे त्यांना तेथेच ठेवणार आहे का ?

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** मग ती व्यवस्था त्याला करावी लागेल त्याची. औषधी वगैरे करण्याची व्यवस्था करावी लागेल त्याला.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** ते तेथेच करतील ते.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** हो ते तेथेच करतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** फक्त पाटील साहेब याच्या संदर्भात मे.न्यायालयाचे सुध्दा निर्णय आहे. ज्या पध्दतीने अशी कावरलेली कुत्रे असली जी समाजाला घातक आहे. त्यांना मारण्याच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने परवानगी दिलेली आहे. म्हणजे जी कुत्री आपण कावरलेली आपण म्हणतो. असे कुत्र्यांना मारण्याच्या संदर्भात निवाळा आहे. त्याच्या संदर्भातील आपण माहिती घ्यावी. म्हणजे सशक्त कुत्रे जे असतील त्यांचा निर्बीजीकरण करण्यात यावे. आणि जी कुत्रे असे असतील. जी अत्यंत खराब अवस्थेत आहे आणि समाजाला घातक आहे. अश्या कुत्र्यांना मारणेच्या संदर्भात कायद्याचा अभ्यास करुन तश्या पध्दतीची सुध्दा उपाययोजना मला वाटते उपाययोजना करणे गरजेचे आहे. हॅलो, हॅलो,

**श्री.अमित काळे :-** कनेक्शन सुटलेले आहे सभागृहातील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता आवाज येतो आहे.

**श्री.अमित काळे :-** नाही आपले आपले आवाज येत आहे.

**मा.सभापती :-** आवाज येत आहे का माझा ? भाऊ आवाज येत आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो आता येत आहे.

**मा.सभापती :-** बाला भाऊ बोला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी म्हणल याच्या पिसाळलेले कुत्रे जे आहेत ना.पिसाळलेले कुत्र्यांच्या बाबतीत त्या कुत्र्यांची विल्हेवाट कश्या पध्दतीने लावायची, याच्या संदर्भात.

**मा.सभापती :-** थांबुन घ्या भाऊ. भाऊ थोडे थांबुन घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो हो.

**मा.सभापती :-** बाला भाऊ बोला.

**श्री.नितीन लढ्ढा :-**प्राणी क्रेश प्रतिबंधक कायद्याच्या अनुषंगाने जी पिसाळलेली कुत्री असेल. त्या कुत्र्यांच्या बाबतीत काय निवाळा दिलेले असतील. किंवा तश्या कुत्र्यांची कश्या पध्दतीने विल्हेवाट लावायची की, जे समाजाला उपद्रव कार्य करतात. त्याच्या बाबतीतला निर्णय सुध्दा घ्यायला पाहिजे. आणि तो निर्णय घेऊन तश्या पध्दतीने सर्वोच्च न्यायालयाचे जे निवाळे झालेले असतील. प्राणी क्रेश कायदा.

**मा.सभापती :-** भाऊ थांबुन घ्या. साऊंड सिस्टीमला प्रॅब्लेम आहे. पर्यायी मागविलेले आहे. थोडया वेळेत चालु होईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो.

**मा.सभापती :-** बोला भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** माझे म्हणणे ऐवढे आहे की, प्राणी क्रेश प्रतिबंधक कायदा आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निवाळे याचा अभ्यास करुन जे कुत्रे पिसाळलेले असतील की, समाजाला या कुत्र्यांपासुन उपद्रव होत असेल आणि लोकांचे जीव जात असतील. अश्या कुत्र्यांच्या बाबतीत नेमके काय करता येईल. आणि तो निर्णय घेऊन सुध्दा सदरहु संस्थेची मदत घेऊन तश्या पध्दतीने जर कधी कायद्याच्या तरतुदी असतील. तर तश्या कुत्र्यांची विल्हेवाट लावण्याच्या संदर्भातील सुध्दा निर्णय याच्यामध्ये समाविष्ट करण्यात यावा.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** हो. ABC रूल मध्ये अशी तरतुद करण्यात आलेली आहे.जे काही असे रेबीज झालेले कुत्रे असतील. त्यांच्यावर काय कार्यवाही करावी याचे सुध्दा निर्देश दिलेले आहे. त्याच्यात असे आहे की, आपले दोन वेटरनरी डॉक्टर असतील, त्यांनी पहिले कन्फ्रम करावे की हे पिसाळलेले आहे किंवा जास्त घातक आहे. त्या कुत्र्यांना सुध्दा पुढे मारण्याचे आपल्याला निर्देश दिलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बस एकज्याटली माझे हेच म्हणणे होते. त्याच्या संदर्भात सुध्दा त्या संस्थेच्या माध्यमातुन प्रशासनाने प्रभावीपणे ते राबवुन घ्यायला पाहिजे. कारण तश्या कुत्र्यांची संख्याही समाजाला खुप घातक आहे.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** नक्की तशी कार्यवाही केली जाईल.

**मा.सभापती :-** नक्की भाऊ आपण सांगितल्या प्रमाणे अंमलबजावणी करण्यात येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.सभापती :-** मुकुंदा भाऊ, मुकुंदा भाऊ.

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** या विषयास माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** नितीन भाऊ सर्वानुमते मंजुर का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो सर्वानुमते मंजुर.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३४७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहरातील भटकी व मोकाट कुत्री पकडुन (प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६०, महाराष्ट्र संरक्षण प्राणी कायदा १९७६ आणि प्राणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१ नुसार) नसबंदी शस्त्रक्रीया करणे तदनंतर ॲन्टी रेबीज लसीकरण करून बेल्ट / कॉलर चिप व कानावर V  नॉच करून पकडलेल्या पुर्ववत ठिकाणी कुत्रे सोडणेकामी AWBI  मान्यता प्राप्त संस्थेची निवड करणे करीता आरोग्य वि./जा.क्र./१०९/२०२१-२२ दि.१७/०९/२०२१ अन्वये वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती.

सदर मुदतीत ०४ ई-निविदा प्राप्त झालेल्या असून लिफाफा क्र.०१ उघडून निविदाधारक यांच्या कागदपत्रांची निविदा समितीसमोर छाननी केली असता पिपल्स फॉर ॲनिमल भंडारा डिस्ट्रीक युनिट

साकोली हे अपात्र ठरत आहे. उर्वरीत ०३ निविदाधारक पात्र ठरत असल्याने आयुक्त यांचे दि.१६/०६/२०२१ रोजीच्या मान्यतेने लिफाफा क्रं.२ उघडले असता निविदाधारक मे.नवसमाज निर्माण बहुउद्देशिय संस्था.नंदुरबार यांचे प्रति श्वाना करिता रु.९३८/- सर्वात कमीचे दर प्राप्त झालेले आहे. निविदाधारक यांनी वाटाघाटी अंती प्रति श्वान करिता रु.९३८/- दर कायम ठेवुन काम करण्यास सहमती दर्शविली आहे.

जळगांव शहरातील भटकी व मोकाट कुत्री पकडुन (प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६०, महाराष्ट्र संरक्षण प्राणी कायदा १९७६ आणि प्राणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१ नुसार) नसबंदी शस्त्रक्रीया करणे तदनंतर ॲन्टी रेबीज लसीकरण करून बेल्ट / कॉलर चिप व कानावर V नॉच करून पकडलेल्या पुर्ववत ठिकाणी कुत्रे सोडणेकामी AWBI मान्यता प्राप्त निविदाधारक मे.नवसमाज निर्माण बहुउद्देशिय संस्था, नंदुरबार यांचे प्रति श्वान करीता रक्कम रू. ९३८/- याप्रमाणे आलेल्या दरास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदर कामी येणारा खर्च हा मनपा फंडातुन (लेखाशिर्ष मोकाट कुत्र्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे) करणेस व निविदाधारकास कार्यादश देण्यापुर्वी करारनामा करुन घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ८ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- सोनवणे मुकुंदा भागवत**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करतो की सर्वांनी राष्ट्रगीत साठी उभे राहायचे आहे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**